# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** एम.आई.डी.सी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0291 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**15/04/2026 23:02

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिंबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिंनाक पासून):** 15/04/2026
   **Date To ( दिंनाक पर्यंत):** 15/04/2026
   **Time From (वेळेपासून):** 14:03 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 14:03 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 15/04/2026 **Time (वेळ):** 22:48 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 045

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 15/04/2026 22:48 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 07 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** चिचोंली येथील भवाणीमाता मंदिरा,रोडवरील गोडावुनमध्ये, जिजळगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** रेश्मा चद्रकांत अवतारे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1991

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | नंदुरबार कम्प लाचलुचपत ,प्रतिंबधक विभाग, जळगाव,एम.आई.डी.सी, जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | नंदुरबार कम्प लाचलुचपत ,प्रतिंबधक विभाग, जळगाव,एम.आई.डी.सी, जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9850906200

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | आसमा परवीन शेख इरफान | | | 1. शिवाजी नगर, जळगाव,एम.आई.डी.सी,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विंलबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद

एमआयडीसी पो.स्टे.
दि.15/04/2026

मी रेश्मा चद्रकांत अवतारे, वय 35 वर्षे, पोलीस निरीक्षक, नेमणुक नंदुरबार कॅम्प लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, जळगाव, मो.नं. 9850906200.

सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद लिहुन देते की, मी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, जळगाव येथे पोलीस निरीक्षक पदावर कार्यरत आहे.

दिनाक 15/04/2026 रोजी तकारदार जुनेद राशिद पिंजारी, वय 30 वर्षे, व्यवसाय-मजुरी, रा. आझाद नगर, पिंप्राळा ता.जि. जळगाव यांनी श्री योगेश ठाकूर, पोलीस उप अधिक्षक ला.प्र.वि.जळगाव यांचेशी फोनद्वारे संपर्क साधुन त्यांची एका लोकसेवकाविरुध्द लाचेसबधी तकार असुन ते 10.30 वाजेचे सुमारास त्यांचे स्वतःचे जळगाव ते छत्रपती संभाजीनगर रोडवरील अहिंसा तिंथ गोशाळा येथे भेटणार असल्याचे कळवले होते. त्याप्रमाणे श्री योगेश ठाकूर, पोलीस उप अधिक्षक यांनी आम्हास तकारदार यांचा फोन नंबर देवुन त्यांनी सांगीतलेल्या ठिकाणी जावुन त्यांना भेटुन पुढील कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. त्याप्रमाणे आम्ही तहसिलदार, तहसिल कार्यालय जळगाव यांना पत्र पाठवुन पंच उपलब्ध करुन देणे बाबत कळवले होते. त्याप्रमाणे त्यांनी श्री. संतोष नारायण कुभांर, महसुल सहायक व श्रीमती चित्ररेखा शिवदास सामुद्रे, महसुल सहायक यांना पंच म्हणुन नियुक्त केले होते. त्यानंतर आम्ही, वर नमुद पंच व सापळा पथकातील पोलीस अमलदार बाळु मराठे, पोलीस अंमलदार राकेश दुसाने, पोलीस अमंलदार प्रदिप पोळ असे सापळा कारवाईसाठी लागणाऱ्या साहित्यासह शासकिय वाहन क्र. MH19 EA6021 वरील चालक श्रेणीपोउपनि / सुरेश पाटील नेम. मोटार परिवहन विभाग, जळगाव यांचेसह अॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांव कार्यालयातुन रवाना होवुन आकाशवाणी चौक, अजिंठा चौफुली मार्गे अहिंसा तिंथ गोशाळा पंपाजवळ पोहचलो. सदर ठिकाणी एक इसम मोटर सायकलसह उपस्थित होता. त्यास आम्ही नाव, पत्ता विचारुन खात्री करता तो तकारदार जुनेद पिंजारी असल्याची खात्री झाली. आम्ही त्यास शासकिय वाहनात बसवुन पंच व सापळा पथकातील पोलीस अंमलदार यांचे समक्ष त्यांचे पुर्ण नाव पत्ता विचारता त्यांनी त्यांचे नाव जुनेद राशिद पिंजारी, वय 30 वर्षे, व्यवसाय- मजुरी, रा. आझाद नगर, पिंप्राळा ता. जि. जळगाव असे सांगीतले. तेव्हा आम्ही त्यांना आमची ओळख सांगुन, त्यांची पंच व सापळा पथकातील पोलीस अंमलदार यांची आपसात ओळख करुन देवुन पुढील सापळा कारवाई सुरु केली.आम्ही तकारदार जुनेद पिंजारी त्यांचे तकारी बाबत सापळा पथकासमक्ष विचारपुस करता त्यांनी सांगितले की, "महाराष्ट्र शासन कामगार विभाग, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळ यांचे ऑन लाईन प्रमाणीमध्ये मजुर असल्याचे ओळखपत्र मिळणे करीता ऑन लाईन अर्ज दाखल केला होता त्याप्रमाणे तकारदार यांना MH110760061284 या नोंदणी कमांकाचे ओळखपत्र मिळाले होते. त्यानंतर तकारदार यांनी शासनाच्या योजनेअतर्गत गृह उपयोगी संच मिळणे करीता दिनाक 09/04/2026 रोजी ऑन लाईन नोंदणी केली होती. त्यानुसार त्यांना दिनाक 15/04/2026 रोजी गृह उपयोगी संच ताब्यात घेण्यासाठी चिंचोली ता.जि. जळगाव या ठिकाणी हजर राहणेबाबत पत्र प्राप्त झाले होते. त्याप्रमाणे तकारदार हे आज दिनाक 15/04/2026 रोजी चिंचोली येथे गृह उपयोगी संच ताब्यात मिळणे कामी गेले असता सदर संच वाटप करण्याऱ्या तब्बसुम मॅडम यांची भेट घेतली तेव्हा त्यांनी तकारदार यांना आसमा मॅडम यांचे कडे जाण्यास सांगितले त्याप्रमाणे तकारदार हे आसमा मॅडम यांचेकडे गेलो तेव्हा त्यांनी तक्रारदार यांना गृह उपयोगी संच ताब्यात घेण्यासाठी तुमची केवायसी करावी लागेल व त्यासाठी तुम्हाला 100 रूपये दयावे लागतील, असे सांगितले. परंतु, सदरची योजना ही शासकीय असुन त्याकरीता पैसे लागत नसल्याने आसमा मॅडम यांनी माझेकडे 100/- रू लाचेची मागणी केली आहे. त्यानंतर तकारदार यांनी त्यांची तकार स्वः हस्ताक्षरात सविस्तर लिहुन दिली होती" त्यावर

तकारदार जुनेद पिंजारी, आम्ही तसेच दोन्ही पंचांनी सहया केल्या होत्या.
सदर तकारीचे अनुषंगाने लाचमागणी पडताळणी कारवाई करावयाची असल्याने आम्ही तकारदार जुनेद पिंजारी व पंच क्र. 1 श्री. संतोष कुंभार यांना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर आमचे सुचनेप्रमाणे पोना/बाळु मराठे यांनी नविन मेमरीकार्ड काढुन ते डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकुन ते सुरु करुन तकारदार जुनेद पिंजारी यांचे शर्टाचे आत गळ्यामध्ये लटकावुन देवुन तकारदार व पंच क. 1 यांना तकारदार यांचेकडील मोटर सायकल कमांक एम एच 19 बी.डी.2680 ने 12.42 वा रवाना केले होते.तकारदार जुनेद पिंजारी व पंच क. 1 श्री. संतोष कुंभार हे सापळा पथकाजवळ परत आल्यानंतर पोना/बाळु मराठे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केले. आम्ही पंच क.1 श्री. संतोष कुभार व तकारदार यांना घडलेली हकीकत विचारली असता त्यांनी ती कथन केली. त्यानंतर आम्ही सापळा पथकासमक्ष तकारदार व खाजगी महिला आसमा शेख यांचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. सदर संभाषणामध्ये आसमा शेख यांनी तकारदार यांना 'सौ रूपये दे दो' असे म्हटले असता त्यावर तकारदार हे "सौ रूपये काय को बहन" असे म्हटल्यावर आसमा शेख यांनी तक्रारदार यांना "ऑन लाईन पेमेंट के" असे उत्तर दिले. त्यावेळी तकारदार यांनी आसमा शेख यांना "मै लेके आता" असे म्हटल्यावर आसमा शेख यांनी ठिक है, लेके आओ, असे म्हणुन तक्रारदार यांचेकडुन 100/- रूपये स्विकारण्याची संमती दर्शवुन लाचमागणी केल्याबाबत खात्री झाली. यावरून महिला आसमा शेख यांनी तक्रारदार जुनेद पिंजारी यांचेकडे गृह उपयोगी संच ताब्यात देण्यासाठी केवायसी करण्याचे मोबदल्यात 100/- रूपये लाचेची मागणी केल्याबाबत आमची व सापळा पथकाची खात्री झाली. तसा सविस्तर लाचमागणी पडताळणी पंचनामा करण्यात आलेला आहे.त्यानंतर आम्ही तकारदार जुनेद पिंजारी यांना महिला आसमा शेख यांचे मागणीप्रमाणे 100/- रुपये लाच रक्कम देण्यासाठी हजर करण्यास सांगीतले. त्यांनी लाच म्हणुन देण्याकरीता त्यांचेकडे असलेले 100/- रुपयाची चलनी नोट आमचे समक्ष हजर केली. त्यानंतर आमचे सुचनेप्रमाणे पंच क. 2 श्रीमती चित्रलेखा सामुद्रे यांनी सदर नोटेचा नंबर एका कोऱ्या कागदावर लिहुन घेतला. त्यावर आम्ही तसेच दोन्ही पंचांनी सहया केल्या. पोलीस अमंलदार प्रदिप पोळ यांनी सदर लाचेच्या नोटेस अॅन्थ्रासीन पावडर लावुन त्याचे प्रात्यक्षिक करुन दाखवुन सदर 100/- रू.ची नोट तक्रारदार यांचे शर्टचे डाव्या बाजुकडील पुढील खिशात व्यवस्थित ठेवुन दिली.त्यानंतर आम्ही तक्रारदार जुनेद पिंजारी व पंच क्र. 1 श्री. संतोष कुभांर यांचेसह लाचेची रक्कम घेवुन चिंचोली येथील भवानी माता मंदिराचे रोडवरील गोडावुनमध्ये पाठविण्याचा निंणय घेतला. त्यानंतर सापळा कारवाई संदर्भात आम्ही तकारदार यांचेसह पंच तसेच सापळा पथकास योग्य त्या सचुना दिल्या. त्यानंतर पोना/बाळु मराठे यांनी आमचे सुचनेवरून डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन ते सुरू करून तकारदार जुनेद पिंजारी यांचे शर्टचे आत लावुन देवुन त्याना चिंचोली येथील भवानी माता मंदिराचे रोडवरील गोडावुन येथे तक्रारदार यांचे मोटर सायकलने रवाना केले व आम्ही सापळा पथकातील सदस्य असे तक्रारदार यांचे मोटर सायकलने मागोमाग रवाना झालो. त्यानंतर तक्रारदार जुनेद पिंजारी व पंच क्र. 1 संतोष कुभांर असे सदर गोडावुनजवळ पोहचले. त्यानंतर आम्ही आमचे शासकिय वाहन सदर गोडावुनपासुन काही अंतरावर थांबवुन सदर गोडावुनच्या आजुबाजुस सुरक्षित जागा घेवुन थांबलो.त्यानंतर तक्रारदार यांनी ठरवुन दिल्याप्रमाणे लाच रक्कम स्विकारल्याबाबत सापळा पथकास कोणताही इशारा न करता ते आमचे जवळ परत आले. त्यावेळी आम्ही तकारदार जुनेद यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, मी आसमा शेख यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम देण्यासाठी त्यांचेकडे गेलो असता त्यांनी मला तुमचा फॉर्म बाहेर आहे, असे सांगितल्यावर मी बाहेर येवुन माझा फॉर्म घेतला व पुन्हा आसमा शेख यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम देण्यासाठी गेलो असता ते सदर ठिकाणी मिळुन आले नाही. त्यामुळे मी परत सदर ठिकाणाहुन परत आलो.त्यानंतर आम्ही पुन्हा तकारदार व पंच क. 1 यांना सुचना देवुन महीला आसमा शेख यांची भेट घेण्यासाठी गोडावुन येथे रवाना केले व आम्ही सदर ठिकाणी सुरक्षित जागा घेवुन थांबलो. त्यानंतर तक्रारदार यांनी ठरवुन दिल्याप्रमाणे लाच रक्कम स्विकारल्याबाबत सापळा पथकास इशारा केला, ती वेळ 14.03 वाजेची होती. तेव्हा सदर ठिकाणी आम्ही व सापळा पथकाने महिला आसमा शेख यांना ताब्यात घेतले. त्यानंतर लागलीच पोना/बाळु मराठे यांनी तक्रारदार यांचेकडे असलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन ते बंद केले. त्यानंतर ताब्यात घेतलेल्या महिला आसमा शेख यांस त्यांचे पुर्ण नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे पुर्ण नांव आसमा परवीन शेख इरफान, वय 38 वर्षे, रा. शिवाजी नगर, जळगाव, ता.जि. जळगांव असे सांगितले.तरी दिंनाक 15/04/2026 रोजी आसमा परवीन शेख इरफान, वय 38 वर्षे, रा.शिवाजी नगर, जळगाव यांनी तक्रारदार जुनेद पिंजारी यांचेकडे त्याचे गृह उपयोगी संच ताब्यात देण्यासाठी चिंचोली येथील भवानी माता मदिंराचे रोडवरील गोडावुनमध्ये केवायसी करण्याचे मोबदल्यात 100/- रूपये लाचेची मागणी करून सदरची लाच रक्कम 14.03 वाजेच्या सुमारास पंच क्र. 1 यांचेसमक्ष स्वतः स्विकारली, म्हणुन त्यांचेविरूध्द सरकारतर्फे भ्रष्टाचार प्रतिंबधक अधिनियम, 1988 चे कलम 7 प्रमाणे फिंयाद आहे.

माझी वरील फिंयाद मी वाचुन पाहीली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर टंकलिखीत केलेली रेश्मा चद्रकांत अवतारे, वय 35 वर्षे, पोलीस निरीक्षक, नेमणुक नंदुरबार कॅम्प लाचलुचपत प्रतिबधक विभाग, जळगाव, मो.नं. 9850906200.

समक्ष,

ही फिंयाद दिली.
दि. 15/04/2026.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
Mukund Sahebrao Patil
**Rank (पद):** HC (Head Constable) **No.(क्र.):** PCMAH91664
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

पोलीस ठाणे अमलदार
एम.आय.डी.सी.पो.स्टे.जळगाव

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**